ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# पर्यावरणाचा शाश्वत विकास: एक सामाजिक जबाबदारी

**डॉ. लिलाधर डी. खरपुरिये**
बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा
तह.- कळमेश्वर, जि. नागपूर

**प्रस्तावना:**

पर्यावरण व आर्थिक विकास याचा जवळचा संबंध आहे. म्हणजेच पर्यावरण व अर्थव्यवस्थेतील व्यवहार यात एक प्रकारचा अनुबंध आहे. आर्थिक व्यवहार हा उपभोग, उत्पादन, विनिमय व वाटणी या अर्थशास्त्राच्या शाखांशी संबंधित असतात. अर्थव्यवस्थेतील हे सर्व व्यवहार पर्यावरणाला प्रभावित करीत असतात. पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवताल पसरलेले वातावरण होय. मानवाने आर्थिक विकासाच्या अभिलाषेने नैसर्गिक वातावरणात हस्तक्षेप वाढविला आहे. तंत्रज्ञानाचा विकासामुळे श्रमाचे प्रतिस्थापन यंत्राद्वारे होत असल्याने नैसर्गिक संसाधनाच्या विदोहणाचा वेग मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. मानव पर्यावरण घटकांचा सतत उपयोग करीत असल्यामुळे प्रदूषणाची समस्या निर्माण झालेली आहे. आपल्या गरजांच्या पूर्ततेसाठी मानव पर्यावरणीय घटकांचा अंदाधुंद उपयोग करीत असल्यामुळे पर्यावरण दूषित झालेले आहे. परिणामतः पर्यावरणात असंतुलन निर्माण होऊन प्रदूषणात दिवसेंदिवस वाढ होताना दिसते. याला मानव समाजच जबाबदार आहे. मानवाने आपल्या स्वार्थाकरिता जंगल कटाई, नद्यांच्या पाण्यात विषारी रसायने विसर्जित, हवेत विषारी वायूची गळती, कीटकनाशके, रासायनिक खते यांचा बेसुमार वापर केला आहे. यामुळे जलप्रदूषण, वायूप्रदूषण, भूमीप्रदूषण, ध्वनीप्रदूषण अशा प्रकारच्या समस्या निर्माण झालेल्या आहे. मानवाच्या व्यवहारामुळे पर्यावरणात अंतर्भूत असलेल्या तत्त्वांचा दिवसेंदिवस ऱ्हास होत आहेत. मानवाचे जीवन वायू, जल, माती, वनस्पती इत्यादी तत्त्वांवर अवलंबून असते. या तत्त्वांच्या गुणांमध्ये दिवसागणित घट होत असल्यामुळे मानवाच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. निसर्ग आणि जीवसृष्टी यातील परस्पर संबंध व संतुलन बिघडत आहे. मनुष्याला जगण्यासाठी प्राणवायूची नितांत गरज असते. परंतु विकसित आणि विकसनशील देशांमध्ये औद्योगिकीकरणाच्या नावाखाली जंगल कटाई करून वायुप्रदूषण मोठ्याप्रमाणावर होत असल्यामुळे लोकांना श्वसनासाठी पुरेसा प्राणवायू सुद्धा मिळत नाही. याचा परिणाम मानवाच्या स्वास्थावर झालेला दिसून येतो. कोरोना महामारीच्या काळामध्ये प्राणवाळूची भासलेली टंचाई व त्यामुळे मरण पावलेले लोक याचे ज्वलंत उदाहरण आहे. मानवाने आपल्या भौतिक सुखसोयींसाठी पर्यावरणाचा अतोनात दोहन केलेला आहे. त्यामुळे पर्यावरणात असंतुलन निर्माण होऊन कोरोना महामारी सारखे साथीचे रोग उद्भवत आहे. यापासून जीवसृष्टीचा बचाव करण्याकरिता नैसर्गिक पर्यावरणात संतुलन प्रस्थापित करणे व याकरिता पर्यावरणाचा शाश्वत विकास आवश्यक आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे:-**

१) पर्यावरण शाश्वत विकास म्हणजे काय? हे अभ्यासणे.
२) जागतिक स्तरावर पर्यावरण शाश्वत विकासाच्या संदर्भातील घडामोडींचा आढावा घेणे.
३) पर्यावरण शाश्वत विकासाच्या संदर्भात शासन व सामाजिक दायित्वाचा अभ्यास करणे.

**पर्यावरण शाश्वत विकास म्हणजे काय?**

"पर्यावरणाला कोणत्याही प्रकारची हानी न पोहोचविता केलेला विकास म्हणजे पर्यावरणीय श्वासत विकास होय."

थोडक्यात, "पुढच्या पिढ्यांचे कोणतेही नुकसान न करता वर्तमान पिढीच्या गरजा भागविणे म्हणजे शाश्वत विकास होय."

वर्तमानकालीन पिढीच्या गरजा भागविताना नैसर्गिक साधन संपत्तीचे इतके विदोहन करू नये की, भावी पिढीच्या गरजा भागविणे अशक्य होईल. विकासाच्या प्रक्रियेमध्ये एक तर नैसर्गिक साधनसंपत्ती स्थिर किंवा त्यात वाढ तरी झाली पाहिजे, तरच त्याला शाश्वत विकास म्हणता येईल. सर्वच पेढ्यांच्या जीवनमानात वाढ करणे हा शाश्वत विकासाचा मूलमंत्र आहे. कोणत्याही देशातील नैसर्गिक साधनसंपत्ती तसेच जल, वायू व भूमी ही साधने त्या देशातील सर्व पीढ्यांची संयुक्त मालमत्ता असते. अल्पकालीन लाभासाठी या साधनसंपत्तीचा विनाश करणे म्हणजे भावी पिढ्यांच्या

हिताचे हनन करणे होय. हे सर्वथा अयोग्य आहे. शाश्वत विकासात ते अपेक्षित नसते. म्हणून विकासाकरिता नैसर्गिक साधन संपत्तीचे वाटप वर्तमान पिढी व भावी पिढ्यांमध्ये अशा प्रकारे करण्यात येते की ह्या साधनांचा वापर सर्वांना करणे शक्य होईल. उदा. पेट्रोल व डिझेल वर्तमान पिढीबरोबर भावी पिढीकरिता सुद्धा शिल्लक असला पाहिजे. याकरिता पेट्रोल, डिझेलचा योग्य पर्याय शोधून त्या पर्यायाचा जास्तीत जास्त वापर करणे म्हणजेच शाश्वत विकास होय. म्हणजेच वर्तमान काळात नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर भविष्यातील पिढ्यांच्या गरजा लक्षात घेऊन केला पाहिजे, जेणेकरून आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात इच्छित संतुलन प्रस्थापित होईल. शाश्वत विकासामध्ये मानवाच्या विकासासाठी निसर्गाचा अशा प्रकारे वापर केला पाहिजे की, निसर्ग आणि पर्यावरणाची हानी होणार नाही आणि निसर्ग आणि विकासामध्ये संतुलन प्रस्थापित होईल. शाश्वत विकासाची संकल्पना सर्वप्रथम १९८७ मध्ये ब्रुंडतलांड रिपोर्टच्या प्रकाशनानंतर चर्चेस आली. या अहवालात जीवाश्म इंधन आणि पर्यावरणावर नैसर्गिक स्त्रोतांच्या अत्याधिक शोषणावर आधारित आर्थिक विकासाचे मुख्य तोटे आणि परिणाम यांचा समावेश होता.

शाश्वत विकासाची संकल्पना ही नैसर्गिक संसाधनाच्या वापराशी संबंधित आहे. वर्तमान काळात ह्या संसाधनांचा वापर अशाप्रकारे केला पाहिजे की, भविष्यकाळात त्यांची उपलब्धता कायम राहील. शाश्वत विकासाचा हा मूलमंत्र आहे की, "तुम्ही स्वतःला इतके चांगले बनवा की येणारे आपल्यापेक्षा अधिक चांगले बनू शकतील." निसर्गाने आपणास जे काही दिले आहे त्याचा अशा प्रकारे वापर करा की येणाऱ्या पिढीला त्याची कमतरता जाणवणार नाही. तसेच शाश्वत विकासामध्ये सामाजिक न्यायाची प्राप्ती, आर्थिक समानता व सर्व क्षेत्रात सामान्य लोकांचा सहभाग इत्यादींना महत्त्वाचे स्थान दिले आहे. आर्थिक विकासाला पर्यावरणापासून वेगळे करणे शक्य नाही. कारण वर्तमान काळात ज्या विकास प्रक्रियेचा अवलंब केला जात आहे ती पूर्णतः उपलब्ध असलेल्या नैसर्गिक संसाधनावर अवलंबून आहे. वेगाने होणाऱ्या औद्योगिकरणामुळे संपूर्ण जगात पर्यावरणाची अतोनात हानी होत आहे. ही हानी कायम स्वरूपाची असून तिची भरपाई करणे शक्य नाही. जमिनीतील पाण्याचा बेजबाबदारपणे अत्याधिक उपसा केल्यामुळे अनेक भागातील जमिनीतील पाण्याची पातळी अत्यंत खालावलेली आहे. मोठमोठ्या नद्यांनी लहान लहान घाणेरड्या ओढ्याचे स्वरूप घेतले आहे. खाणीतील खोदकामामुळे जंगल उजाड होत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर लोक विस्थापित झालेले आहेत. म्हणून या समस्येपासून मुक्ती मिळविण्याकरिता शाश्वत विकास प्रक्रियेचा अवलंब करणे आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्र परिषदेच्या न्यूयॉर्क येथे झालेल्या शिखर परिषदेमध्ये शाश्वत विकासाचा अजेंडा स्विकारून त्यादृष्टीने जागतिक लक्ष निश्चित केले गेले आहे. जगाच्या बहुतेक शहरांचा विकास वेगाने होत असताना नागरिकांच्या राहणीमानावर त्या विकासाचा प्रतिकूल परिणाम होऊ नये. यासाठी डिसेंबर २०३० पर्यंत शाश्वत विकासाच्या उद्दिष्टपूर्तीकडे वाटचाल करण्याचे धोरण स्वीकारण्यात आले आहे. म्हणून संयुक्त राष्ट्राद्वारे २०१५ मध्ये शाश्वत विकासाचे जे ध्येय निश्चित करण्यात आले. त्याला जागतिक समुदायाकडून स्वीकृती मिळालेली आहे. संयुक्त राष्ट्राद्वारे निर्धारित विकासाचे ध्येय आणि भारत सरकारने निवडलेले ध्येय यात बऱ्याच प्रमाणात साम्य आहे. त्यात सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणाच्या विविध उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. यात एकंदर १७ ध्येय व १६९ उद्दिष्टे समाविष्ट आहे. ही उद्दिष्टे २०३० पर्यंत पूर्ण करायची आहेत. यात शाश्वत विकास प्राप्तीच्या उद्दिष्टापेक्षा समावेशकतेवर जास्त भर देण्यात आलेला आहे. समावेशक समाज आणि समावेशक वृद्धी याविषयी यात विवेचन केले आहे. शाश्वत विकास आणि समावेशक विकास यांच्यातील परस्पर संबंध त्यात दर्शविला आहे. वास्तविकतः समावेशक विकास हा शाश्वत विकासाचा एक भाग आहे. नीती आयोगाने शाश्वत विकास आराखड्याच्या अंमलबजावणीनंतर SDG इंडिया इंडेक्स २०१८ च्या स्वरूपात भारताच्या कामगिरीचा दस्तऐवज तयार केला होता. गेल्या २०० वर्षात जागतिक अर्थव्यवस्था ६ पटीने वाढली. औद्योगिक क्रांतीचा लाभ घेतलेल्या देशांमध्ये तर ती १० पटीने वाढली. त्या देशांच्या राहणीमानात, आरोग्य सेवेत खूप बदल झाले. पण या विकासाची त्या त्या देशाने मोठी सामाजिक किंमत सुद्धा चुकती केली आहे. कोणत्याही अविचाराने किंवा नियोजनाशिवाय केलेला अनियंत्रित विकास हा शाश्वत विकास होऊ शकत नाही. कोणत्याही अर्थव्यवस्थेचा विकास होत असताना त्या व्यवस्थेतील समाज, निसर्ग व विकास यांची योग्य ती सांगड घातली

गेली नाही तर त्या अर्थव्यवस्थेचा पूर्ण नाश होतो. विकासाबरोबर आजुबाजुचा निसर्ग, वातावरण व समाजाचे सशक्तीकरण करण्याकडे दुर्लक्ष होता कामा नये. यात मानव जातीचे अतोनात नुकसान होते. उदा. सिंधू संस्कृती, ईजिप्त व दक्षिण अमेरिकेची अर्थव्यवस्था कशा व कधी नष्ट झाल्यास हे ठामपणे सांगता येत नाही. आज सर्व विश्व आर्थिक विकास, सामाजिक व नसर्गिक साधनसंपत्ती ची मागणी यामध्ये सुवर्णमध्य कसा साधायचा या विवंचनेत आहेत. शाश्वत विकासाची सामाजिक किंमत ही कमीत कमी नुकसानीत पाहिजे, म्हणून त्या त्या देशांनी विकासाच्या तीन स्तंभाची काळजी घेतली पाहिजे. हे तीन स्तंभ म्हणजे निसर्ग, समाज आणि अर्थव्यवस्था होय. निसर्ग व हवामानातील बदल, विकासासाठी झाडांची होणारी कत्तल, प्रदूषण हे सर्वच विषय चिंतेची आहेत. या विषयांवर सध्या जगभरात हिरिरीने चर्चा होत आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीची सर्वांनाच काळजी वाटत असली तरी एका वर्षात मानव ५००० कोटी टन नैसर्गिक संपत्ती निसर्गाकडून ओरबडून काढत असतो. म्हणूनच विकास साधतांना निसर्गाकडून हावरटपणे त्याची संपत्ती न ओरबडता ती नियोजनबद्ध पद्धतीने काढावी. या संपत्तीचा जास्तीत जास्त पुनर्वापर करण्याच्या पद्धती अमलात आणाव्यात. कोळसा, खनिजतेल अशा इंधनांना लवकरात लवकर पर्याय शोधावेत. म्हणजे शाश्वत विकासाचा हा खांब टिकून राहील.

समाज शाश्वत विकासाचा दुसरा स्तंभ आहे. सकल घरेलू उत्पादनाचा दर ८ ते ९ टक्के अपेक्षित असताना शाश्वत विकास कसा होईल, हे चिंतनीय आहे. या आर्थिक विकासाची मोठी किंमत समाजाला चूकवावी लागू नये व पुढच्या पिढ्यांच्या विकासाला तो मारक सुद्धा ठरू नये. हे तपासण्याची जबाबदारी संपूर्ण समाजाची काम आहे. निसर्ग, समाज व आर्थिक विकास यात संतुलन राखणे निश्चितच कठीण आहे. तरीपण जागतिक पातळीवर सर्व राष्ट्रांनी सहकार्याची भूमिका स्वीकारली तर पर्यावरणीय शाश्वत विकासाचे ध्येय सत्यात उतरवता येऊ शकते. मानवाने विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचे अतोनात नुकसान केले आहे. यामुळे मनुष्य नैसर्गिक प्रकल्पाचे चटके सुद्धा सहन करीत आहे. गेल्या ४५ कोटी वर्षामध्ये पृथ्वीने ६ वेळा विनासाचा सामना केला आहे. या पृथ्वीवर असलेली जैवविविधता प्रत्येक विनाशाचा वेळी नष्ट होत गेली आहे. आज आपण जी जैवविविधता बघतोय ती केवळ ०.०१ टक्के इतकीच शिल्लक आहे. तर ९९.९९ टक्के जैवविविधता गेल्या कोटी वर्षामध्ये नष्ट झालेली आहे. या उरलेल्या ०.०१ टक्के जैवविविधतेपैकी ७० टक्के जैवविविधता केवळ १२ देशांमध्ये विभागली असून त्यामध्ये भारताचाही क्रमांक आहे. आपण जेंव्हा जैवविविधता नेहाळतो. तेंव्हा सुंदर रंगीबेरंगी फुलपाखरे, विविध जातीचे पशुपक्षी, फुले, झाडे, उंचच उंच डोंगर, हिरवगार जंगल हे बघून मन हिरावून जातो. मात्र लाखो वर्षापूर्वी १०० टक्के जैवविविधतेने नटलेल्या पृथ्वीचे सौंदर्य कसे असेल याची कल्पनाच आपण करू शकत नाही. म्हणून जी नैसर्गिक संपत्ती नष्ट झाली त्याला पुनच्छ निर्माण करणे कठीण आहे. मात्र जे शिल्लक आहे ती कसी टिकवता येईल, त्यात आणखी कशी भर घालता येईल, याचा मानव निश्चितच विचार करू शकतो. याकरिता मानवाने जास्तीत जास्त वृक्षरोपण करून त्याच्या संवर्धनाची जबाबदारी सुद्धा स्वीकारली पाहिजे. शिवाय ऊर्जा निर्मितीकरिता जास्तीत जास्त सौर ऊर्जा, जल ऊर्जा व पवन ऊर्जेचा वापर करायला पाहिजे. 'हरित अर्थसंकल्प' ही शाश्वत विकासाला अपेक्षित असणाऱ्या पर्यावरणीय समतोल, सामाजिक प्रगती व आर्थिक प्रगती या सर्व घटकांना एकत्रित आणणारे अंदाजपत्रक आहे. यात अर्थसंकल्पातील किती निधी हा पर्यावरणीय घटकांसाठी खर्च केला जातो. त्याचे मोजमाप करता येते. यात पर्यावरण संवर्धनाला प्रोत्साहन देणे व पर्यावरणाची हानी करणाऱ्या घटकांवर कर आकारून त्यांना निरुत्साही करणे, अशा धोरणांचा अंतर्भाव या अर्थसंकल्पात केला जातो. हरित अर्थसंकल्पात पुढील पर्यावरणीय घटकांवर केला जाणाऱ्या निधीचा समावेश होतो.

१) हवामान बदलाच्या आव्हानाशी लढण्यासाठी निधी.
२) जमीन, पाणी या नैसर्गिक स्त्रोत जपण्यासाठी निधी.
३) स्वच्छ ऊर्जास्त्रोतांच्या निर्मितीसाठी आवश्यक निधी.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पात (२०१४-१५) अल्प कार्बन उत्सर्जनाच्या दिशेने मार्गक्रम करणारा तो पहिला अर्थसंकल्प मानता येईल. या अर्थसंकल्पात वन व पर्यावरण मंत्रालयाला १३८४ कोटी रुपये, ऊर्जा मंत्रालयाला १३४९ कोटी रुपये दिले गेले होते. तर ३८४४ कोटी रुपये जलस्त्रोतासाठी पुरविण्यात आले होते. तसेच १४ व्या वित्त आयोगाने केंद्राकडून राज्यांना हस्तांतरित केल्या जाणाऱ्या निधीचे निकष ठरविताना पर्यावरणीय

घटकांना प्राधान्य दिले आहे. त्यात वन आच्छादन हा घटक अंतर्भूत केला आहे. म्हणजेच राज्यांना केंद्राकडून जास्त निधी मिळवायचा असेल तर राज्यांनाही शाश्वत विकास करणे अत्यावश्यक आहे. एकूणच भारताच्या शाश्वत विकासात आगामी काळात अर्थसंकल्पातील हरितता महत्त्वाची भूमिका बजावणार आहे हे निश्चित.

**सारांश:-**

पर्यावरणाचा शाश्वत विकास ही एक सामूहिक सामाजिक जबाबदारी आहे. गेल्या कित्येक वर्षापासून मानवाने औद्योगिक विकासाकरिता पर्यावरणातील नैसर्गिक साधनसंपत्तीचे अतोनात दोहन केले आहे. परिणामतः निसर्गात असमतोल निर्माण होऊन महापूर, भूकंप, दुष्काळ, साथीचे रोग अशा प्रकारची नैसर्गिक आपत्ती मानवावर आलेली आहेत. शिवाय वायू प्रदूषण, जल प्रदूषण, भूप्रदूषण, ध्वनि प्रदूषण अशा समस्याही निर्माण झालेल्या आहेत. विकसित व विकसनशील देशांनी आपल्या आर्थिक विकासासाठी मोठ्या प्रमाणावर जंगल कटाई, कोळसा खाणीची निर्मिती, दूषित रासायन मिश्रित पाणी, कारखान्यांच्या चिमण्यांमधून धूर वातावरणात सोडलेली आहेत. तसेच शेतीमधून जास्तीत जास्त उत्पादन घेता यावे, म्हणून रासायनिक खतांचा अधिक वापर, कीटकनाशक औषधांची फवारणी यांचा अति वापर केल्यामुळे जमीन बनजड झाली आहे. निसर्गाने आपणास भरपूर दिले आहे. मात्र आज निसर्गालाही परत देण्याची वेळ आली आहे. पर्यावरणात समतोल राखायचे असेल तर मोठ्या प्रमाणावर वृक्षरोपण करून त्यांचे संवर्धन करणे गरजेचे आहे. मोठमोठ्या जल प्रकल्पांची उभारणी करून पर्यावरणाचे नुकसान करण्यापेक्षा लहान लहान तलावाची निर्मिती करणे, परंपरागत ऊर्जा साधना ऐवजी अपरंपरागत ऊर्जास्रोतांचा वापर करणे व कारखान्याचा चिमणीतून निघणाऱ्या धुरावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. याकरिता औद्योगिक क्षेत्रातील व्यवसायिक कंपन्यांना त्यांच्या निव्वळ नफ्याच्या २ टक्के रक्कम पर्यावरण संरक्षणाकरिता खर्च करावी लागते. व्यवसायिक कंपन्यांनी ही रक्कम खर्च करीत असताना ही माझी सामाजिक जबाबदारी आहे, या वृत्तीने खर्च करायला पाहिजे. शिवाय शेतीमधील पिकांचे उत्पादन वाढीकरिता रासायनिक खतांऐवजी जैविक खतांचा वापर, प्राणीमात्रांवर प्रेम या तत्त्वांचा अवलंब केल्यास आपण निश्चितच पर्यावरणाचे संरक्षण करून येणाऱ्या पिढीकरिता प्रदूषण मुक्त पर्यावरण देऊ शकतो. ज्याला पर्यावरण शाश्वत विकास असे म्हणता येईल. ही एक सामूहिक सामाजिक जबाबदारी आहे.

**संदर्भ:-**

1. प्रा. बी. एल. जिभकाटे व डॉ. सुधाकर शास्त्री, भारतीय अर्थव्यवस्था-II, विश्व पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स नागपूर, २०१८
2. डॉ. जी. एन. झामरे, भारतीय अर्थव्यवस्थाः २, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, २०१८
3. https://mr.vikaspedia.in
4. https://mr.wikipedia.org
5. https://www.google.com
6. https://mdailyhunt.in
7. https://maharashtratime.com